e-news letter

e जलसेवा Bulletin

Enabling efficient water management
कार्यक्षम जलव्यवस्थापनासाठी

Volume : III Issue : 5 September 2013

Government of Maharashtra
Water Resources Department

• Editor •
T. N. Munde

• Executive Editor •
Sharad Dabhadkar

• Editorial Board •
Mrs. Purnima Desai  Mr.Prashant Kadam
Mrs. Dhanashree Limaye  Mr.Avinash Patil

**Our Vision** *Transform WRD into modern & service driven department through Information & Communication Technology*

## संपादकीय



आयसीआयएस ई-जलसेवा प्रकल्पाचा वापर जलसंपदा विभागात सुरू झाला असून मोड्युलमध्ये माहिती भरण्यात येत आहे. ही माहिती भरण्यासाठी क्षेत्रिय स्तरावरून सर्व अडचणींवर मात करून सकारात्मक प्रयत्न केले जात आहेत, ही बाब विशेषत्वाने नमूद कराविशी वाटते. संपूर्ण महाराष्ट्रातून २०८६ प्रकल्पाची प्राथमिक माहिती प्रणालीमध्ये भरण्यात आली आहे. मा.महालेखाकार, नागपूर यांनी कोयना संकल्पचित्र मंडळास दि. १२/८/२०१३ रोजी भेट दिली. त्यांनी या भेटीत ऑनलाईन मासिक लेखे भरण्याबाबतचा आढावा घेतला. त्यानंतर मंत्रालयात झालेल्या बैठकीत याबाबत केलेल्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले आहे.

मास्टर्स ट्रेनर्सचे विविध कार्यप्रकारातील प्रशिक्षण आता नियमितपणे सुरु असून त्यास उत्तम प्रतिसाद मिळत आहे. व्यवस्थापन कार्यप्रकारातील मोड्युलचे विकसनाचे काम पूर्ण झाले असून श्री. रमेश निकुम, सहसचिव तथा मुख्य अभियंता यांनी दिनांक ३०.०८.२०१३ रोजी कोयना संकल्पचित्र मंडळास भेट देऊन व्यवस्थापन मोड्यूलच्या प्रगतीचा आढावा घेतला आहे.

मा.प्रधान सचिव (ला.क्षे.वि.) स्वत: प्रणालीमध्ये माहिती भरण्याचे कामाचा आढावा घेणार असल्याने या कामास सर्व स्तरावर प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. प्रणालीमध्ये माहिती लवकरात लवकर भरण्याचे काम पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे. त्यानंतर आपणा सर्वांना विविध अहवाल पाहून सनियंत्रण शक्य होणार आहे.

पुढील मास्टर ट्रेनर्सचा प्रशिक्षण कार्यक्रम निश्चित केला असून सर्व मंडळाकडून नामांकने पाठविण्याचे आवाहन केले आहे. यामध्ये व्यवस्थापन व बांधकाम कार्यप्रकार एम-१८ व एम-१९ चे प्रामुख्याने प्रशिक्षण पूर्ण करण्यात येईल. गुणनियंत्रण व यांत्रिकी या कार्यप्रकारातील मास्टर ट्रेनर्सचे प्रशिक्षणही ऑगस्ट २०१३ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. ई-जलसेवा अभियान दि. १५ सप्टे. ते १५ ऑक्टो. या काळात राबविण्यात येणार आहे.

**प्रत्यक्ष डेटा भरण्यासाठी वापरावयाच्या संकेत स्थळाचा पत्ता**
https://wrd.maharashtra.gov.in
**सराव किंवा प्रशिक्षणासाठी वापरावयाच्या संकेत स्थळाचा पत्ता**
http://wrdtest.maharashtra.gov.in/portal
ई-जलसेवा विषयक सर्व प्रकारच्या अडचणींसाठी /सल्ल्यासाठी
सहाय्यता केंद्र संपर्क क्र. : ०२०-२५४४०३९३
बांधकाम व व्यवस्थापन कार्यप्रकारातील नामांकने सत्वर पाठविण्यात यावीत.

## ई-जलसेवा अभियान - १५ सप्टें. ते १५ ऑक्टो.

'ई-जलसेवा' हा जलसंपदा विभागाचा प्रकल्प महाराष्ट्र दिनापासून कार्यान्वित झाला असून ३१ मोड्यूल्स वापराकरीता संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीकरिता जलसंपदा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य मिळत आहे. प्रकल्पाच्या मंडळ स्तरावरील मास्टर ट्रेनर्सच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम प्रभावीपणे मेटा, नाशिक येथे राबविण्यात येत असून त्यास आपणा सर्वांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

१५ सप्टेंबर हा दिन 'अभियंता दिन' म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून दि. १५ सप्टें. ते १५ ऑक्टो. हा कालावधी 'ई-जलसेवा अभियान' म्हणून साजरा करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या महिन्यात

१) ई-जलसेवा विषयक जागृती निर्माण करणे
२) सर्व कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा आयोजित करणे.
३) मंडळांतर्गत विविध मोड्यूलसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.
४) मास्टर ट्रेनर करिता एकदिवसीय कार्यशाळा.
५) 'झिंब्रा मेल' हा शासकीय ई-मेल आयडीचा वापर
६) मासिक लेखे ऑनलाईन सादर करणे.
७) ई-प्रशासन विषयक व्याख्याने आयोजित करणे. तसेच विविध उपक्रम, स्पर्धा मंडळस्तरावरून आयोजित करण्यात याव्यात.

उदा. प्रणालीत माहिती भरण्याविषयक आंतरविभागीय स्पर्धा, ई-जलसेवा विषयक प्रश्न मंजूषा, ई-जलसेवा विषयक उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना विशेष प्रोत्साहन देणे इ.


'ई-प्रशासन अभियान' कार्यक्रमात सर्व अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने सहभाग घेऊन त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा. तसेच मंडळ स्तरावरील अधिकाऱ्यांनी कार्यक्रमाचा आराखडा तयार करून त्याचे नेटके आयोजन करावे व याविषयी 'ई-प्रशासन प्रकल्प व्यवस्थापन कार्यालयास' egovpmo_pune@wrd.maharashtra.gov.in अवगत करावे. धन्यवाद!



मा.रत्नपारखी, महालेखाकार, नागपूर यांनी ऑनलाईन मासिक लेखा सादर करण्याबाबतचा तयारीचा आढावा घेण्यासाठी कोयना संकल्पचित्र मंडळास दि. १२ ऑगस्ट रोजी भेट दिली.

## ई- जलसेवा: प्रशिक्षण कार्यक्रम

**ग. गो. बैरागी,** अधिक्षक अभियंता व सहसंचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक- ४२२ ००४



ई-जलसेवा आय.सी.आय.एस. प्रकल्प जलसंपदा विभागातील नाविण्यपूर्ण प्रकल्प असून प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्रातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना विविध मोड्यूलचे प्रशिक्षण महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक येथे देण्यात येत आहे.

श्री. विजय पांढरे, मुख्य अभियंता व कोयना संकल्पचित्र मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. टी. एन. मुंडे यांनी विचार विनियम करून मास्टर ट्रेनर्सचे प्रशिक्षण म.अ.प्र.प्र. नाशिक येथे घेण्याची संकल्पना मांडली. महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक येथील प्रशिक्षणार्थींसाठी उपलब्ध असलेल्या सेवा सुविधेचा या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी चांगला उपयोग होत आहे.

ई-जलसेवा आय. सी.आय.एस. अंतर्गत मास्टर ट्रेनर्सचा प्रशिक्षण कार्यक्रम महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक येथे घेण्याचे निश्चित झाल्यानंतर या संस्थेतील अधिकारी व कर्मचारी यांनी कोयना संकल्पचित्र मंडळास सर्वोतोपरी सहकार्य केले. एकावेळी ५० प्रशिक्षणार्थींची मास्टर ट्रेनर्सची तुकडी पार पाडण्यासाठी योग्य ती सर्व व्यवस्था संगणक कक्ष, इंटरनेट सुविधेसह महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक येथील दोन कक्षामध्ये तयार करण्यात आली आहे.

१५ एप्रिल २०१३ पासून मास्टर ट्रेनर्सचा प्रशिक्षण कार्यक्रम चालू आहे व त्यास उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत विविध कार्यप्रकारातील ४२७ मास्टर ट्रेनर्स (५००० प्रशिक्षण दिवस) प्रशिक्षित करण्यात आले आहेत. कोयना संकल्पचित्र मंडळांतर्गत ई-प्रशासन (प. व्य.) कार्यालय सातत्याने प्रशिक्षणाकरिता नामांकने घेण्यापासून ते मे. विप्रो. लि. यांच्या सहकार्याने नियोजनबद्ध प्रशिक्षण कार्यक्रम पार पाडण्यामध्ये अविरत कार्यरत आहे. यासाठी एस.एम.एस. व ई-मेल चा खुबीने वापर करण्यात येत आहे. यापुढील ३ महिन्याचा ई-जलसेवा आय.सी.आय.एस. कार्यक्रम प्राप्त झाला असून त्याप्रमाणे प्रशिक्षण पूर्ण होईल. तद्नंतर ई-जलसेवा आय.सी.आय.एस. अंतर्गत अल्प कालावधीची प्रशिक्षण सत्रे महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक येथे मास्टर ट्रेनर्सच्या सहकार्याने घ्यावयाची आहेत.

शासनाच्या या महत्त्वपूर्ण प्रकल्पाचा जलसंपदा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना निश्चितच उपयोग होईल व महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक सदर प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी सदैव कार्यरत राहिल.

## ई-जलसेवा वृत्तांत

### प्रणालीतील नवीन बदल

१) सिंचन व्यवस्थापन कार्यप्रकारातील मोड्युल एम १८ व एम १९ यांचे विकसन पूर्ण झाले आहे. या कार्यप्रकारातील बिगर सिंचन पाणी वापरासंबंधी माहिती तातडीने भरणेत यावी.

२) एखादा प्रकल्प एकापेक्षा जास्त कार्यालयाअंतर्गत विभागला गेला असेल तर सर्व कार्यालयांची नावे प्रणालीद्वारे भरणे व त्यासंबंधी माहिती भरणे आता शक्य आहे.

३) मोड्यूल एम-२ व एम-१२ प्रशिक्षण दि. ३/९ ते ६/९/२०१३ स्थळ : मेटा नाशिक

४) सिंचन व्यवस्थापन मोड्यूल दि. २३/९/१३ ते ८/१०/२०१३ स्थळ : मेटा नाशिक

## ई- जलसेवा: डाटा डिजिटायझेशन

### डाटा डिजिटायझेशन डॅश बोर्ड

- हा डॅशबोर्ड सर्व कार्यकारी संचालक / मुख्य अभियंता तसेच अधीक्षक अभियंता यांना उपलब्ध करण्यात आला आहे.
- भरलेली माहिती कार्यकारी संचालक ते उपविभागीय स्तरापर्यंत तपासणे शक्य आहे.
- भरण्यात आलेली माहिती मोड्युलनिहाय तपासता येणार आहे.

जास्तीत जास्त माहिती प्रणालीमध्ये भरल्यामुळे आपल्याला वारंवार करावे लागणारे काम कमी होणार आहे, त्यामुळे प्राधान्याने हे काम मास्टर ट्रेनरच्या मदतीने पूर्ण करण्यात यावे. आतापर्यंत भरलेल्या माहितीबाबत प्रकल्प व्यवस्थापन कार्यालयाची निरिक्षणे :-

प्रणालीमधील ज्ञान भांडार (Knowledge Store) मध्ये मोड्युलनिहाय User Manuals उपलब्ध आहेत. त्याचा वापर करुन बऱ्याच शंकांचे निरसन होईल.

१. एम-८ मोड्युलमध्ये प्रामुख्याने सुरुवातीच्या लिंकमध्ये माहिती भरण्यात येते. परंतु पुढील लिंक्समध्ये अत्यल्प माहिती भरली जाते. त्यामुळे अचूक व अद्ययावत अहवाल प्राप्त होत नाहीत.

२. प्रणालीमध्ये भरलेल्या माहितीची तपासणी सक्षम अधिकाऱ्यामार्फत होणे आवश्यक आहे.

३. सर्व कार्यालयांचे Login IDs मंडळनिहाय पाठविण्यात आले आहेत.

तरी याबाबत शंका असल्यास यापूर्वीच कळविण्यात आलेल्या ई-जलसेवा मदतकक्षाशी संपर्क साधावा.

ई-जलसेवा मदत कक्ष - ०२०-२५४४०३९३
ई-मेल - icis-support@wipro.com
icis.support@wipro.com



कार्यकारी अभियंतास्तरीय २ दिवसीय कार्यशाळा (१२ व १३ ऑगस्ट १३)



गुणनियंत्रण मोड्युल एम ११ प्रशिक्षण वर्ग ५ ते ८ ऑगस्ट २०१३

**Be an ICIS e-news author......**

**We at ICIS e-news letter offer an opportunity to our readers to contribute articles and be a part of a family of ICIS e-news author. In particular, we will appreciate receiving contributions on articles bearing on innovative approach in e-governance, development and use of software in day to day**

